# ललित कला केंद्र (गुरुकुल)
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## एम्.ए. (संगीत) प्रवेश परीक्षा
## नमुना प्रश्नपत्रिका

1. संगीतनाटकाचा आरंभ --- या गीताने होतो. (क) नांदी (ख) भरतवाक्य (ग) पोवाडा (घ) भावगीत
2. ख्याल गायनाच्या साथीसाठी --- हे वाद्य वापरतात. (क) ढोलकी (ख) बुलबुलतरंग (ग) तबला (घ) पखवाज
3. हिंदुस्थानी संगीत पद्धती ही ग्रंथमाला ---- यांनी लिहिली. (क) पं. भातखंडे (ख) वामनराव देशपांडे (ग) बी. आर. देवधर (घ) वि.दि. पलुसकर
4. गौडसारंग या रागात दोन्ही --- आहेत. (क) गांधार (ख) धैवत (ग) ऋषभ (घ) मध्यम
5. धमार व झूमरा हे दोन्ही ताल ---- मात्रांचे आहेत. (क) १२ (ख) १६ (ग) १४ (घ) १५
6. आधुनिक काळात रागांग पद्धतीचे शास्त्र विवेचन ---- यांनी केले. (क) पं. पलुसकर (ख) ना. मो. खरे (ग) बी. आर. देवधर (घ) रामाश्रय झा
7. टप्पा शैलीचा उद्गाता म्हणून --- याचा उल्लेख होतो. (क) तानसेन (ख) सदारंग (ग) शोरी मिया (घ) असफुद्दौला
8. विलंबित लयीतील तरान्यास ---- म्हणतात. (क) खयालनुमा (ख) टपतराना (ग) शाहनुमा तराना (घ) तिल्लाना
9. व्याकरणनिष्ठता अधिक असणे हे ---- या संगीतकोटीचे लक्षण होय. (क) कलासंगीत (ख) आदिमसंगीत (ग) धर्मसंगीत (घ) जनसंगीत
10. मिया की तोडी या रागाची निर्मिती ---- या गायकाने केली. (क) तानसेन (ख) बिलासखान (ग) शोरी मिया (घ) अदारंग
11. कर्नाटक संगीतातील ७२ मेलांचा सिद्धांत ---- यांनी सर्वप्रथम मांडला. (क) व्यंकटमखी (ख) भातखंडे (ग) त्यागराज (घ) श्यामाशास्त्री
12. संतूर या वाद्यास रागसंगीतात महत्त्वाचे स्थान ---- यांनी दिले. (क) हरिप्रसाद चौरासिया (ख) शिवकुमार शर्मा (ग) राहुल शर्मा (घ) रविशंकर
13. प्रेमपिया या मुद्रेने ---- यांनी बंदिशी केल्या. (क) फैयाझ खां (ख) विलायत हुसेन खां (ग) लताफत हुसेन खां (घ) बडे गुलाम अली खां
14. प-सा-प-सां या क्रमाने ---- या वाद्याच्या तारा जुळवतात. (क) सतार (ख) सरोद (ग) तंबोरा (घ) व्हायोलिन
15. भातखंडे स्वरलिपीमध्ये सम दाखवण्यासाठी --- हे चिन्ह असते. (क) + (ख) 0 (ग) १ (घ) X
16. पलुसकर स्वरलिपीमध्ये तार सप्तकातील स्वर दर्शविण्यासाठी ---चे चिन्ह वापरतात. (क) स्वरावर उभी रेष (ख) स्वराखाली आडवी रेष (ग) स्वरावर बिंदू (घ) स्वराखाली बिंदू

17. उद्गाता, प्रस्तोत, प्रतिहर्ता असे ---- करणाऱ्यांस म्हणतात. (क) टप्पा गायन (ख) प्रबंध गायन (ग) वाद्य वादन (घ) सामगायन
18. पुष्टीमार्गी संगीतालाच --- असे म्हणतात. (क) हवेली संगीत (ख) वारकरी संगीत (ग) बाउल संगीत (घ) गुरुमत संगीत
19. संगीत रत्नाकर ग्रंथात प्रबंधांचे विवरण ---- व्या अध्यायात आहे. (क) १ (ख) ३ (ग) ४ (घ) ७
20. कर्नाटक संगीतातील कृतीगायनातील उत्स्फूर्त आविष्कारास --- म्हणतात. (क) नेरवळ (ख) चिट्टस्वर (ग) मनोधर्म संगीत (घ) तनिआवर्तनम्

---